ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : गालिप्रदाननिषेध

प्रकाशक : बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, बॉम्बे

प्रकाशन वर्ष : १९०६

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

Bound Nov-3, 1919

# गालिप्रदाननिषेध.

## ON ABUSIVE LANGUAGE.

( 2nd Edition Revised. )

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.

Marathi 16mo Series: 1.000 Copies.

1906.

मुंबईमध्यें

मेथोडिस्ट छापखान्यांत छापिलें.

---

सन १९०६. आवृत्ति दुसरी.

*Price ¼ Anna.* किंमत पाव आणा.

# गालिप्रदाननिषेध

अथवा

## शिवीगाळ करणें टाकून देण्याविषयीं बोध.

ख्रिस्ती शास्त्रांत असें एक वाक्य आहे, कीं (कल. ४:६) "तुमचें बोलणें सर्वकाळ कृपायुक्त असावें, मिठानें चवदार केलेलें, म्हणजे तुह्मांस प्रत्येकाला कसकसें उत्तर द्यावें लागतें, हें तुह्मीं जाणावें." मनुष्याचें बोलणें गोड असलें पाहिजे. तें जर कडू असलें तर तें त्याच्या करण्यालाहि कडू करितें; मनुष्याचें कडू बोलणें कदाचित् कोणीं मनावर न घेतलें व त्याची कोणीं परवा न केली तरी "जो जो शब्द माणसें बोलतील त्याचा हिशोब तीं न्यायदिवशीं देतील" (मात्थी १२:६).कारण ईश्वर निष्काळजी नाहीं. ह्मणून सर्व मनुष्यांनीं आपण काय बोलतों याविषयीं सावध असावें.

आपल्या महाराष्ट्र देशांत तर गालिप्रदानाचा प्रघात फारच आहे; लहान, मोठे, पुरुष, स्त्रिया, श्रीमंत, दरिद्री, अविद्वान्, साऱ्यांच्या तोंडीं शिवी ही आहेच.

कित्येकाच्या तोंडीं ह्या गालिप्रदान पिशाचानें आपलें आसन असें घातलें आहे, कीं दहा पांच शब्दांआड तें आपलें तोंड पुढें करितेंच. कित्येक तर पावलोपावलीं शिव्या देत असतात; तरी जसें झिंगलेल्या मनुष्यास आपण काय बोलतों याचें भान नसतें, तसें त्यांस आपल्या बोलण्यांत शिव्यांचा जप किती झाला याची आठवण देखील राहत नाहीं.ही गालिराक्षसी कोणावर वर्षाव करीत नाहीं ? योग्यायोग्य जाणणारा एकटा मानव प्राणीच हिच्या प्रसादाला पात्र होतो असें नाहीं. तर पशु जो योग्यायोग्य जाणत नाहीं, त्याच्यावरही प्रसाद होत असतो. फार काय सांगावें ? निर्जीव पदार्थावर देखील ह्या राक्षसीच्या जपाचा वर्षाव होतो. याप्रमाणें हा देश ह्या गालिराक्षसीनें आपल्या स्वाधीन करून घेतला आहे. एथील लोकांवर हिनें आपला अंमल इतका बसविला आहे, कीं ते आपल्या लेंकरांसही शिव्या देण्यास शिकवितात. ह्या राक्षसीच्या अधिकाराचा फैलाव इतका झालेला आहे, कीं बहुतकरून हा सर्वच देश देवासमोर दंडास पात्र ठरला आहे. यास्तव सर्वांनाच ह्या दुष्ट सवयीच्या कबज्यांतून सोड

विण्याचा कांहीं तरी उपाय सांगावा ह्मणून मीं हा लहानसा निबंध लिहिण्यास हातीं घेतला आहे.

प्रथमतः गालिप्रदान ह्मणजे शिवी किती प्रकारची असते यांचा आपण विचार करूं. पहिला प्रकार—शाप, ह्मणजे दुसऱ्याचें वाईट व्हावें अशा इच्छेचें दर्शक भाषण करणें; उदाहरण, 'मढें जावो,' 'सत्यनाश होवो,' 'पोट जळो,' 'केरसुणी फिरो,' इत्यादि. शिवीचा हा प्रकार ह्या देशांतल्या स्त्रियांत आढळतो. दुसरा प्रकार—अपमानाच्या अथवा जेणें-करून मनुष्य चिडेल अशा नांवांचा उपयोग करणें. उदाहरण, 'लुच्च्या,' सोद्या,' लबाडा,' चोरा,' 'गाढवा,' 'बैला,' 'डुकरा,' 'मूर्खा,' इत्यादि. हा प्रकार स्त्रीपुरुषांच्या तोंडीं आहे. तिसरा प्रकार—ज्याला शिवी द्यायाची तो गैर अवलादीचा आहे, अशा अर्थाच्या शब्दांचा उपयोग करणें. उदाहरण, 'गाढवीचा,' 'शिंचा,' 'भिकाऱ्याचा,' 'रांडेचा,' 'मोठा लेंक सावकाराचा,' इत्यादि. ह्या शिव्या फारकरून पुरुषांच्याच तोंडीं असतात. ह्या उदाहरणांतील पहिली शिवी इतर जातींच्या, व दुसरी ब्राह्मणांच्या पूर्ण परिचयांतील आहे.

चवथा प्रकार—आई, बहीण, बायको, किंवा मुलगी ह्यांच्यावरून शिव्या देणें. ज्याला शिवी द्यावयाची त्याच्या ह्या माणसांशीं आपण कुकर्म करण्यास तयार आहों, किंवा दुसऱ्या कोणीं तरी तें केलें असतां आपणास संतोष होईल, अशा अर्थाचे शब्द उच्चारणें. असल्या शिव्या बहुतकरून पुरुषांच्या तोंडीं फार असतात. स्त्रिया ह्यांचा उपयोग क्वचित् करितात. तरी अज्ञान स्त्रियांमध्यें असल्या शिव्यांचा इतका प्रघात आहे, कीं कधीं कधीं ह्या एका गुणामुळेंच एखाद्या बाईला सारा गांव भीत असतो.

शिव्यांचे हे चारी प्रकार वाईटच आहेत; तरी त्यांतले त्यांत शेवटले दोन तर फारच वाईट आहेत.

शिवीचे हे सर्व प्रकार दुसऱ्यांस बिघडविणारे व चीड आणणारे असून, शिवी देणारांच्या अब्रूस डाग लावणारे व त्यांस नीतिभ्रष्ट करणारे आहेत. जे शिव्या देत नसतात ते मात्र ही गोष्ट कबूल करतात असें नाहीं, तर ज्यांच्या तोंडीं मनस्वी शिव्या आहेत ते देखील हें कबूल करितात. शिव्या देणें चांगलें आहे, असें फारकरून कोणीच ह्मणत नाहीं.

एका माणसाच्या बोलण्यांत दहापांच शब्दांआड शिव्या येत असत. तो आईबहिणीवरून शिव्या देत असे. त्याला मीं ह्मटलें, " आपणाला दरमहा पांच सहा रुपयांची प्राप्ति असेल, आणि त्यासाठीं सारा दिवस फारच कष्ट पडत असतील, परंतु जर तुह्मांला सावलींत बसून शिव्या देण्याचें काम सांगितलें, आणि दरमहा दहा रुपये मिळण्याची तजवीज केली, तर तें काम तुह्मी पतकराल काय ?" त्यानें जबाब दिला, कीं " तुह्मीं दहा नाहीं, वीस जरी दिले, तरी असलें वाईट काम करण्याचें मी कबूल करणार नाहीं. असें काम मीं जन्मांत कधीं ऐकिलें नाहीं." मग मीं त्याला बोध केला, कीं पैसा घेऊन करूं नये इतकें वाईट काम तुह्मी फुकट कसें करतां ? फुकट केलें ह्मणजे त्याचा दोष लागत नाहीं असें तर नाहीं ? हें ऐकून तो माणूस फारच लाजला. शिवी देणाराला त्याच्या सहज शिवी देण्यांत कोणीं धरिलें तर त्याला लाज प्राप्त झाल्याशिवाय राहत नाहीं. यावरून स्पष्ट दिसतें, कीं शिवी देणें वाईट आहे, असें शिव्या देणारांस देखील वाटतें.

शिव्या देण्यानें आपली व दुसऱ्याची बिघडणूक होते. ती अशीः आपल्या देखोदेखीं दुसरे शिव्या देण्यास शिकतात, अथवा आपण ज्याला शिवी दिली तो उलटून तीच शिवी आपल्याला देतो. लेंकरांच्या तोंडीं तर शिव्या तेव्हांच बसतात. कारण मनुष्याचा जन्मस्वभाव पापी आहे ह्मणून त्याला पापकर्में शिकविल्यावांचून साधतें. सारांश, शिव्यांच्यायोगानें बिघडणूक खरोखरच होते.

बोलण्यांत शिवेरेपणा असला ह्मणजे त्या मनुष्याच्या भाषणानें माणसें चिडतात, कोणी कोणी तर इतके चिडतात, कीं शिवी देणारांस मारायास उठतात. फार काय सांगावें ? या भाषणानें इष्टमित्रांमध्यें देखील वांकडेपणा येतो. आईबाप, लेंकरें, सासवासुना, बहीणभावंडें यांची जी परस्पर प्रीति असते, ती जाऊन तीं एकमेकांशीं अबोला धरतात व एका ठिकाणीं राहणें सोडतात. उदाहरणार्थ, माझ्या पाहण्यांतीलच एक गोष्ट सांगतों. एका परटानें आपल्या भाच्याला ह्मणजे आपल्या सख्ख्या बहिणीच्या मुलाला आपली लेक दिली होती. एकदा त्यानें त्या बहिणीला एकच शिवी दिली. तिनें

तिचें मन इतकें दुखविलें, कीं ती त्या भावाशीं मरेपर्यंत बोलली नाहीं. ह्मणजे तिनें त्याच्याशीं एकसारखा अबोला धरला होता. त्या परटाला आपल्या लेकीकरितां कधीं कधीं तिच्या घरीं जावें लागे. पण तो गेला तरी ती त्याच्याशीं बोलत नसे. भावाच्या एकाच शिवीनें त्या बहिणीचें मन इतकें कठोर केलें. शिवी-मुळें माणसें चिडतात व त्यांचा आपसांत वांकडेपणा येतो यांत संशय नाहीं. याला अनुसरून एक ऐकीव जुनी कविता खालीं दिली आहे.

### श्लोक.

मधुर वचनयोगें विश्व विश्वास पावे ।
मधुर वचनयोगें शत्रु ते मित्र व्हावे ॥
मधुर वचनयोगें डुलतो मत्त हस्ती ।
मधुर वचनयोगें सर्वही साध्य होती ॥ १ ॥
दुष्टोत्तरें मित्रपणासि तोडी ।
दुष्टोत्तरें पुत्रहि संग सोडी ॥
दुष्टोत्तरें शत्रु बहू दुणावे ।
यालागिं दुष्टोत्तर हें नसावें ॥ २ ॥

ख्रिस्ती शास्त्रांत ह्मटलें आहे, कीं " गोड उत्तर कोप हटविते परंतु कठोर भाषण क्रोध चढवितें " ( नीति. १५:१ ). हें खरें आहे; कोणत्याही प्रकारें पाहतां शिव्यांनीं मित्रपणा राहत नाहीं, शिवी देणारानें कोणावर शेंकडों उपकार केले असले तरी त्यांचा विसर पडून शिवी दिल्याबद्दल त्याचा सूड उगवावा अशी दुष्टबुद्धि त्याला उत्पन्न होते. असें कित्येकांचें झाल्याचें पाहण्यांत आहे.

गालिप्रदान हें तें करणाऱ्याच्या अब्रूला डाग लावणारें आहे. कारण, तो बेअब्रूचा मनुष्य आहे असें लोक मानतात. मोठमोठे शेटसावकार, मामलेदार, फौजदार, पाटील, कुळकर्णी वगैरे मोठमोठ्या लोकांच्या तोंडांत शिव्या असल्यास, त्यांच्या हुद्दयाकडे पाहून भीतीमुळें बाह्यात्कारीं लोक त्यांचा मान करीत असले, तरी त्यांनीं आपल्या मनामध्यें त्यांच्या अब्रूचा एकंदर आढावा काढलेला असतो. शिव्या देणाऱ्या अंमलदारास जर कोणी म्हणेल, कीं " आपण फार शिवरे आहां " तर ह्यानें आपली बेअदबी केली असें वाटून त्यास फार राग येईल. ह्याचा अर्थ इतकाच, कीं शिवरे असणें हें

बेअब्रूचें आहे, ही गोष्ट त्या शिव्या देणाऱ्या अंमलदारास सुद्धां कबूल असतें. सारांश, शिवीगाळ करणें हें तें करणारास, व ज्याला शिवीगाळ केली त्यास, असें उभयतांसहि बेअब्रूचें वाटत असतें.

शिव्यांनीं मनुष्य नीतिभ्रष्ट होऊन ईश्वराच्या क्रोधास पात्र होतो. कारण, ईश्वरानें मनुष्यमात्रास बोलण्याची शक्ति यासाठीं दिली आहे, कीं त्यांनीं एकमेकांशीं मधुर भाषण करावें व ईश्वराची स्तुति करून त्याचे गुणानुवाद गावे. तसें न करितां त्याच्या आज्ञांविरुद्ध भाषण केलें तर तेथें प्रीति कशी राहील? व ईश्वराच्या आज्ञांविरुद्ध भाषण होत असतां त्याला क्रोध कां येणार नाहीं? चांगला बोध करीत असतां जर त्या बोलण्यांत शिव्यांची भेळ केली, तर तो बोध वजनाचा वाटणार नाहीं, परंतु त्या चांगल्या बोधाचा दुरुपयोग होऊन तो अनीतीचा ठरेल. कोणी कोणी आईबहिणींवरून शिव्या देत असतां, किंवा कोणी बाई आपल्या आप्तांस शाप देत असतां तसेंच करावें किंवा व्हावें अशा बुद्धीनें देत नाहीं. आणि कित्येक प्रसंगीं हें खरें आहे; कारण एखादी बाई आपल्या मुलाला ह्मणते, कीं "याचें मढें जावो," तेव्हां

खचीत आपला मुलगा मरावा असें ती इच्छीत नसते, तरी तिला दोष लागतो. कारण, ईश्वराच्या न्यायास अनुसरून आपण आपल्या बोलण्यावरून सुद्धां न्यायी किंवा अन्यायी ठरूं; कोणी शिवी देतांना ती त्यानें बुद्धिपुरःसर दिली नसली, तरी तो आपल्या बोलण्याला जपत नाहीं एवढ्यावरूनच दोषी ठरेल. सहजीं तरी शिव्या द्याव्या किंवा दिल्या असतां दोष लागणार नाहीं असा जगांतील कोणत्याही धर्माच्या शास्त्रांत आधार मिळेल असें मला वाटत नाहीं. उलट शिवी देणाराला दोष लागून शेवटीं नरकाची प्राप्ति होणार असेंच सर्व धर्मशास्त्रें सांगत आहेत. हिंदु धर्मशास्त्रांत ह्या पापाला वाक्‌पारुष्य (कठोर भाषण) ह्मटलें आहे, आणि त्याबद्दल प्रायश्‌चित्तहि सांगितलें आहे. याप्रमाणें विचार पाहतां गालिप्रदान वाईटच आहे; ह्मणून सर्वांनीं या दुष्ट सवईला आपल्यापासून घालवायास झटलें पाहिजे. सर्वदा जें कांहीं बोलायाचें तें असें बोलावें, कीं त्यांत मनुष्याचें कल्याण व ईश्वराचें गौरव होईल. कारण "जर कोणी बोलण्याविषयीं चुकत नाहीं तर तो पूर्ण माणूस, आपल्या सर्व शरीरालाही

आकळावयास शक्तिमान् आहे" (याको. ३:२). अशा मनुष्याकडून दुसऱ्यांचीही सुधारणा होईल.

शिवी देणें वाईट आहे, हानिकारक आहे. या देशच्या लोकांच्या तोंडांतून शिवी समूळ नाहींशीं होणें फारच अवघड आहे, कारण त्यांची ही दुष्ट संवय फारा दिवसांपासून वाढत जाऊन मोठ्या वृक्षाप्रमाणें इच्या मुळ्या खोल जाऊन थोर, सत्तावान् लोकांच्या तोंडीं इला आश्रय मिळाला आहे. लग्न-समारंभांत कित्येक जातींतल्या वधूवरांच्या पक्षांच्या बायका एकमेकींवर शिव्यांचा असा वर्षाव करतात, कीं पुरुषाला त्या ऐकणें फारच लाजिरवाणें वाटतें. एकदा कांहीं गोंड लोक आमच्या गांवीं उतरले होते. त्यांचे एथें एक लग्न झालें, त्या समारंभांत त्यांच्या बायका अंगाला घाम येईपर्यंत एकमेकींस शिव्या देत होत्या, इतकेंच नव्हे, तर त्या शिव्या बीभत्स खुणांनीं स्पष्ट करून दाखवीत होत्या. मला तेथें उभें राहणें गोड वाटलें नाहीं. ह्या गालिप्रदानराक्षसीला असा खंबीर आश्रय मिळाला असतां ती सहज निघेल तरी कशी ? ख्रिस्ती शास्त्रांत म्हटलें आहे: "पाहा घोड्यांनीं

आह्मांस मानावें ह्मणून आह्मी त्यांच्या तोंडांमध्यें लगाम घालितों, आणि त्यांचें सर्व शरीर फिरवितों. पाहा, तारवेंही एवढीं मोठीं आहेत व प्रचंड वाऱ्यानें लोटून जातात तरी जिकडे सुकाणदाराची इच्छा होते तिकडे फार लहान सुकाणाकडून फिरतात." परंतु "जीभ लहान अंग आहे पण मोठ्या गोष्टीची फुशारकी सांगते. पाहा, थोडकी आग केवढ्या गंजीला पेटविते." सारांश, "श्वापदांची व पांखरांची व वळवळणाऱ्यांची व जलचरांची प्रत्येक जात वश होत असते आणि मनुष्यजातीनें वश केलेली आहे, परंतु जिभेला वश करायास कोणी माणूस शक्तिमान् नाहीं. ती अनिवार दुष्ट, मरणकारक विषानें भरलेली आहे." तरी ईश्वरी साहाय्य मिळाल्यावर ही गोष्ट अशक्य नाहीं, ह्मणून त्याचें साहाय्य मागून प्रयत्न करावे. एवढी शिवी ह्या देशांतून नाहींशी व्हावी ह्मणून सर्वांनीं मनापासून उपाय केले पाहिजेत; तसेंच, या देशांत शिवी देणारा एक देखील नाहीं असें व्हायाला पुष्कळ वर्षें पाहिजेत, तरी आपण प्रयत्न करतां राहूं नये. निराशेनें नाहीं, परंतु

पूर्ण आशेनें, खातरीनें, व निश्चयानें उपाय चालवावे ह्मणजे ईश्वर साह्य होईल; आणि ह्या बाबतींत आपला देश सुधारेल यांत संशय नाहीं. आतां गालिप्रदानरूपी दुष्ट राक्षसीला आपल्या देशांतून घालविण्याचे जे उपाय मला सुचतात ते थोडक्यांत सांगतों.

पहिला उपाय—लेंकरांच्या तोंडीं शिवीचें भाषण नसावें ह्मणून घरांतील वडिलांनीं व शाळेंतील शिक्षकानें फार जपावें, ह्मणजे मुलांच्या तोंडांतून अयोग्य शब्द निघाला तर त्याविषयीं त्यांचा निषेध करण्यास त्यांनीं हयगय करूं नये. शिवाय, आपणही कोणास शिव्या देऊं नयेत, कारण नुसत्या निषेधानें मुलांच्या तोंडांतून शिव्या जातील असें नाहीं, कारण मुलांचें लक्ष वडिलांच्या बोलण्याकडे व आचरणाकडे फार असतें; कोणी समजतात, कीं आह्मी वडील आहोंत व आमची मुलांवर सत्ता आहे, यास्तव आह्मीं त्यांस शिव्या दिल्या तरी त्यांनीं त्या देऊं नयेत, कारण, त्यांला इतका अधिकार नाहीं, म्हणून त्यांनीं गप्प राहावें. परंतु अशी समजूत मुलांच्या शिव्या बंद करण्याच्या अगदीं उपयोगी नाहीं. कां तर हें कारण

त्यांस समजल्यावरही त्यांस शिव्या देण्यास जागा राहते. कशी? तर ते स्वतः आपल्या धाकट्या भावंडांपेक्षा व भावंडांच्या लेंकरां-पेक्षा वडील असतात, ह्मणून त्या धाकट्यांस किंवा शेजा-ऱ्याच्या लेंकरांस शिव्या देण्याची आपल्याला सत्ता आहे असें त्यांस वाटूं लागतें. कदाचित् भयामुळें वडिलांसमोर व शिक्ष-कांसमोर, तीं तसें करणार नाहींत, परंतु मागें ह्याचा वचपा काढण्यास सोडणार नाहींत. तर आपणच ईश्वर प्रत्येक शब्दाचा हिशोब घेईल हें लक्षांत ठेवून वागावें, व शिवीचा आपल्या तोंडास विटाळ होऊं देऊं नये हें बरें.

दुसरा उपाय—सरकारी कामदारांच्या हातीं आहे; ह्मणजे मामलेदार, फौजदार, पोलीस, पाटील, कुळकर्णी इत्यादि-कांना शिवी देणें बंद करण्याचें अगत्य वाटलें पाहिजे. त्यांनीं कायद्याच्या आधारानें शिवी देणें मोठा गुन्हा आहे असें लोकांच्या लक्षांत येईल, अशा रीतीनें गुन्हेगारांस योग्य शिक्षा करावी. आणि गुन्हेगारांस किंवा कोणासही ताकीद किंवा धमकी देतांना आपल्याही मुखांतून शिवी न निघावी ह्मणून काळजी घ्यावी. जर सरकारी कामदार आपल्या

मुखातून शिव्या न याव्या ह्मणून मनापासून जपतील आणि शिवीचा गुन्हा करणारांस कायद्याप्रमाणें वारंवार शासन करतील. तर शिवी देणें बरेंच बंद होईल. ज्याच्यायोगानें शिवी देण्याला उत्तेजन मिळेल अशा गोष्टी वर्ज्य कराव्या.

१. रागाचे समयीं आपलें बोलणें आवरावें अथवा अगदीं बोलूंच नये. आणि राग दूर व्हावा, शिवी मुखांतून न निघावी ह्मणून एकान्तस्थलीं जाऊन प्रार्थना करीन असा निश्चय करावा, आणि तशीच वहिवाट ठेवली तर शिवी तोंडांतून सहज निघूं नये ह्मणून एक मोठाच बंदोबस्त होईल.

२. इष्काचीं गाणीं ह्मणणें व ऐकणें वर्जावें. कारण त्यांत सर्व शिव्यांचाच प्रकार आहे, व दुष्टाई करण्याचा मोहही आहे. त्यांत विशेषेंकरून पोऱ्याचा किंवा कळवंतणीचा नाच करून तीं इष्काचीं गाणीं ह्मणविणें तर फारच वाईट आहे. कारण त्यांत शिव्यांचा प्रकार हावभावांसुद्धां असतो. आई-बहिणीवरून सहजीं शिव्या देणाऱ्याच्या मनांत पापाची कल्पना फारकरून नसते, परंतु नाचाच्या वेळीं जीं माणसें गाणीं ह्मणतात त्यांच्याच नव्हे, परंतु गाणीं ऐकणाऱ्यांच्या

देखील मनामध्यें पापाची कल्पना भरून जाते. अशा इष्काच्या गाण्यानाचण्याच्या नादानें कित्येक गरती बायका कळवंतिणी झाल्या, व दुसऱ्या कित्येक नवरा सोडून नाच्या पोऱ्याच्यामागें लागून गेल्या, ह्मणून हा प्रकार मोडण्यास सर्वांनीं मनापासून झटावें.

३ अति थट्टा वर्जावी. थट्टा मस्करीची संवय आपल्याला लागूं देऊं नये. कारण, आपल्या बोलण्यावरून लोकांनीं जितकें अधिक हसावें अशी हौस आपणास वाटते तितकें अधिक आपणास थट्टेचें भाषण करावेंसें वाटतें; व जितकी अधिक थट्टा आपण करूं, तितकें अधिक अभद्र भाषण आपल्या तोंडांतून निघण्याचा संभव आहे, ह्मणून थट्टा करणें तर ती मर्यादेबाहेर जाणार नाहीं अशी करावी.

४ कृष्णाला हिंदु लोकांनीं आपला देव मानिला असून तो बालब्रह्मचारी होता अशी त्यांची समजूत आहे. परंतु तो अट्टल थट्टा करणारा व विषयी होता. त्याची कथा किंवा त्याच्यावर झालेलीं काव्यें वाचूं नयेत किंवा ऐकूं नयेत; कारण कीं मोठ्या मोठ्या अवतारी पुरुषांनीं जर अशीं कामें केलीं आहेत

तर तींच आह्मींहि केलीं असतां त्यांत गैर काय झालें असें कोणाच्या मनाला वाटलें तर तें नवल नाहीं. व एकदा असें वाटल्यावर बीभत्स भाषणाची तर मुळींच भीति वाटणार नाहीं.

५ शिमग्यासारखे सण सोडावे. कारण त्यांत लोकांच्या रीतीप्रमाणें शिव्या देण्यास पूर्ण मुभा आहे. ह्मणून असले सणच मोडले तर फार चांगलें होईल. ज्या दिवशीं हे मोडले जातील तो सुदिन ह्मटला पाहिजे. कारण कीं येणेंकरून मोठमोठीं पापें ज्या प्रसंगीं होतात असे कित्येक दरसाल येणारे समय नष्ट होतील.

६ साधुजनांचें व विशेषेंकरून जगद्गुरु व जगदुद्धारक जो प्रभु येशू ख्रिस्त याचें उदाहरण घेऊन, त्यांच्या पावलांस अनुसरून चालावें. त्यांचीं बोलणीं कशीं होतीं व त्यांस लोकांनीं पुष्कळ त्रास व दुःखें दिलीं असतांही ते लोकांशीं कसे बोलले, त्यांत प्रभु येशूचें बोलणें कसें निर्दोष होतें, हें पाहण्यासाठीं ख्रिस्ती शास्त्र वाचावें.

७ आणखी एक विशेष गोष्ट ही आहे, कीं मनाची शुद्धता झाली पाहिजे, म्हणजे तें पालटून अगदीं नवें

झालें पाहिजे. कारण, “अंतःकरणांत जें भरलें आहे त्याप्रमाणें तो बोलतो. चांगला माणूस अंतःकरणाच्या चांगल्या भांडारांतून चांगल्या गोष्टी काढितो आणि वाईट माणूस वाईट भांडारांतून वाईट गोष्टी काढितो” (मात्थी. १२: ३४, ३५). एका हिंदु कवीनेंहि ह्मटलें आहे, कीं “ज्याचें अंतःकरण शुद्ध ॥ त्याला करणें नलगे बोध ॥” याचा अर्थ हाच, कीं, शुद्ध मनाचा मनुष्य आपोआपच शुद्ध भाषण करील. ह्मणून परमेश्वराजवळ प्रभु येशूच्या नांवानें विनंती करून पवित्र आत्मा मागावा. तो अंतःकरण शुद्ध करितो.

शेवटीं असा विचार करावा, कीं ज्यानें शिव्या देणें अगदीं वर्ज केलें आहे त्याला कोण कोणते लाभ होत असतात.

१. ज्यांत शिव्या आहेत असलें भाषण टाकून जो गोडच भाषण करील तो सर्वांचा आवडता होईल; घरचीं व बाहेरचीं माणसें त्याजवर प्रीति करतील. तीं त्याच्या-जवळ असल्यानें संतुष्ट होतील व त्याचा वियोग होण्यानें दुःखित होतील. तो श्रीमंत असला तर त्याला चाकरांची वाण

होणार नाहीं. त्याला गरज पडेल ती जिन्नस लोक त्याला खुशीनें देतील, व अडचणीच्या प्रसंगीं जितकी होईल तितकी त्याला मदत करतील. असा जो गोड भाषणाचा मनुष्य तो राजमान्य व लोकमान्य होईल.

२. त्याच्या हातून दुसरींहि अनेक पापें होणार नाहींत. ईश्वराच्या सर्व आज्ञा परस्परांशीं इतक्या संबद्ध आहेत, कीं त्यांतली एक मोडली तर तिजबरोबर दुसऱ्याही मोडल्या जातात; तसेंच, एक आज्ञा पाळीन ह्मटलें तर तिच्यासाठीं दुसऱ्याहि पाळाव्या लागतात. जर कोणीं एखाद्याला आई-वरून शिवी दिली तर त्यांत शिवी दिली हें एक पाप तर झालेंच, पण त्याचे आईशीं व्यभिचार करण्याचें मनांत आणलें, हें दुसरें पाप झालें. तसेंच, ज्यास शिवी दिली त्यास दुःख दिलें हें तिसरें पाप; आणि चवथें, ज्यास शिवी दिली त्याच्या आईचा अपमान केला, आणि पांचवें ज्या कोणांसमक्ष शिवी दिली त्यास वाईट उदाहरण दाखविलें. ह्मणून जेव्हां कोणी शिवीच देत नाहीं तेव्हां तो आपणाला इतक्या पापांपासून आंवरितो.

३. शिव्या वर्जण्यापासून भांडणें मोडत जातील. फार-करून असें आढळण्यांत येतें, कीं प्रथमतः एक दुसऱ्याला

शिवी देतो, मग दुसराही त्याला देतो. याप्रमाणें शिव्यांमागून शिव्या बाहेर पडत पडत भांडण वाढत जाऊन शेवटीं तें मारामारीवर येतें. तेंच प्रथम शिवी न दिली तर मुळीं होतच नाहीं. ख्रिस्ती शास्त्रांत ह्मटलें आहे, " गोड उत्तर कोप हटवितें, परंतु कठोर भाषण क्रोध चढवितें " ( नीति १५ : १ ). ह्मणून जिच्यायोगानें राग येतो व तो चेतत जातो ती शिवीच बंद झाली, तर भांडणेंहि आपोआप बंद होतील. ह्याच्या उलट " मनोरम वचनें मधाचा शिसा अशीं आहेत, तीं मुखाला गोड व हाडांस आरोग्य आहेत " ( नीति १६ : २४ ); ह्मणून गोड भाषणानें, भांडणामुळें जो अबोला असेल तो नाहींसा होऊन प्रीति उत्पन्न होईल. सारांश, अभद्र भाषण वर्जण्यापासून असे पुष्कळ लाभ आहेत.

शिवी देण्यांत पुष्कळ नुकसान व तिच्या वर्जण्यांत पुष्कळ लाभ होतात, ह्मणून शिवीचा त्याग सर्वांनीं करावा असे उपाय जे मला सुचले ते मीं वाचणारांस सादर केले आहेत; व बहुत सुज्ञ जनांस विचारांतीं आणखीहि सुचण्याजोगे आहेत. तर तेही करून शिवी नामें दुष्ट राक्षसीला आपल्या मुलखांतून लवकर घालविण्याची कोणीं हयगय करूं नये. तशांत ख्रिस्ती लोक जे " जगाचें मीठ, " " जगाचा उजेड, " " डोंगरावर

वसलेलें नगर " अशा प्रकारच्या संज्ञा ख्रिस्ती शास्त्राकडून पावले आहेत, त्यांच्या तोंडीं तर ह्या अभद्र भाषणाचा लव-लेश नसावा. याशिवाय, त्यांचे जे अन्यधर्मी मित्र व सहवासी लोक सहज बोलतां बोलतां शिव्या देतात त्याचाहि त्यांनीं गोडीगुलाबीनें निषेध करावा. माझी तुह्मां ख्रिस्ती भावांस ही एक विनंती आहे, कीं ज्यानें हा लहानसा निबंध लिहिला आहे, त्याच्या तोंडांत अभद्र भाषण चुकूनहि येऊं नये ह्मणून त्याच्यासाठीं प्रार्थनेचा ऐकणारा जो परमेश्वर त्याच्या-जवळ प्रार्थना करावी.

## अभंग.

शिवी खाणें कोणा ॥ जरा आवडेना ॥
खेद होतो मना ॥ सर्वांच्याच ॥ १ ॥
शिव्यांचा देवाला ॥ आहे हो कंटाळा ॥
ठेवी हिशोबाला ॥ सर्व शब्द ॥ २ ॥
शिवरे उदंड ॥ झाले खंडोखंड ॥
पावतील दंड ॥ शिव्यांमुळें ॥ ३ ॥
ह्मणून सर्वांनीं ॥ शिवी ही सोडूनी ॥
लागावें चरणीं ॥ ख्रिस्ताचीया. ॥ ४ ॥

## "जीभ चळूं नये म्हणून काय करावें ?"

### अभंग.

जीभ चळूं नये ऐशी । जरि इच्छा बाळगीशी ॥ १ ॥
तरी ऐक माझें वच । इष्टकामप्रद साच ॥ २ ॥
बोलायाचें ज्याच्यापाशीं । पूर्ण ध्यानीं आण त्याशीं ॥ ३
हेतु काय बोलण्याचा । पूर्ण शोध करीं ह्याचा ॥ ४ ॥
ज्याच्यासंबंधें बोलशी । उभा पूढें पाहीं त्याशीं ॥ ५ ॥
बोलणें तें केव्हां ? कैसें ? । कुठें करीं प्रश्न ऐसे ॥ ६ ॥
दास ह्मणे प्रभूपुढें । बोलबोलशी तेवढे ॥ ७ ॥

" बालबोधमेवा. "

## "जिभेला अर्ज."

चाल—स्वार्थी जी प्रीति मनुजाची सहज ती.

जिव्हे गे ऐक गरिबाचा अर्ज हा ॥ ध्रु० ॥
आत्मस्तुतिला परनिंदेला सोडुन दूर रहा ॥ १ ॥
रम न असत्यीं खरोखरीं गे रौरव दुसरा ह्या ॥ २ ॥

व्याजोक्ती अतिशयोक्ति नलगे नच होवश कलहा ॥३॥
आशीर्वचनें दे मम होतां मानाची अपहा ॥ ४ ॥
होतां निंदा छळ मम कर गे "ख्रिस्ता जय" जप हा॥५॥
तुला वाहिलें प्रभुला माझी चिंता तूं न वहा ॥ ६ ॥

" भजनसंग्रह. "

---

## ट्रॅ० सो० च्या कित्येक पुस्तकांची यादी.

| | किंमत आणे | पै. |
|---|---|---|
| येशू ख्रिस्ताचें चरित्र .... | २ रु०, १२, ९ | ० |
| गुरुचरित्र आणि गुरुबोध .... .... | ० | ६ |
| उपदेशरत्नमाला. .... .... .... | ४ | ० |
| मूर्तिपूजेविषयीं संभाषणें. .... .... | १ | ० |
| वेदांत काय आहे ? .... .... .... | १ | ० |
| जातिभेदविवेचन. .... .... .... | ० | ६ |
| समुद्रकिनाऱ्यावरचा वादविवाद. .... | ४ | ० |
| यमुनापर्यटन.... .... .... .... | ४, ३ | ० |
| होळीचे सणाविषयीं ग्रंथ. .... .... | ० | ६ |
| खंडोबा आणि त्याचे भक्त .... .... | ० | ६ |
| ब्राह्मणांचें महत्व. .... .... .... | १ | ० |
| उद्धारमार्गविज्ञान. .... .... | ८, ६, ४ | ० |
| नासिकक्षेत्राची यात्रा. .... .... | ० | ६ |
| ख्रिस्ती धर्म आणि हिंदु धर्म यांची तुलना. | १ | ६ |
| श्रीयेशूख्रिस्तकृत सुसंवाद .... .... | ६, ४ | ० |
| शंकानिवृत्ति. .... .... .... | ० | ३ |
| हृदयदर्पण .... .... .... .... | २ | ० |